जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट क्रमांक - २३४ दिनांक - १५/०४/२०२२

**युनिट-१,गुन्हे शाखा,पुणे शहर**

**पीएमपीएमल बसमध्ये प्रवासी महिलांच्या बांगडया चोरी करणारी तडीपार गुन्हेगारांची टोळी जेरबंद**

दिनांक ०७/०४/२०२१ रोजी युनिट १ कडील पोलीस अधिकारी व अंमलदार असे गुन्हे शाखा युनिट – १ कार्यालयात हजर असताना **पोलीस अंमलदार** यांना त्यांचे बातमी-दारा मार्फत बातमी मिळाली की, **तडीपार गुन्हेगारांची टोळी** हे रिक्षा क्रमांक एमएच/१२/ एनडब्ल्यु/३९३३ हिचेसह पुणे स्टेशन बस स्टॅन्ड येथील परिसरात चोरी करण्यासाठी येणार आहेत. त्याप्रमाणे सदर बातमीची खात्री करुन कार्यवाही करण्याकरीता युनिट-१ कडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना वरिष्ठांनी आदेशित केले.

पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीप्रमाणे पुणे स्टेशन परिसरात फिरत असताना पुणे स्टेशन बस स्टॅन्ड येथे संशयित रिक्षा नंबर एमएच/१२/एनडब्ल्यु/३९३३ ही दिसुन आल्याने सदर रिक्षास घेराव घालुन रिक्षातील इसम नामे **१)सर्फराज दत्तु गायकवाड,वय-४१ वर्षे,रा.सर्वोदय कॉलनी,म्हसोबा मंदिरा जवळ,आनंदनगर, मुंढवा,पुणे २)योगेश गणेश माने,वय-४० वर्षे,रा.स.नं.९४,सर्वोदय कॉलनी,प्रकाश प्रोव्हीजन स्टोअर्स मागे,मुंढवा पुणे** रिक्षासह ताब्यात घेवुन गुन्हे शाखा,युनिट १, कार्यालय,पुणे येथे घेवुन येवुन त्यांचेकडे **शिवाजीनगर पो स्टे गुरनं ४२/२०२२ भादंवि कलम ३७९** याबाबत विश्वासात घेवुन तपास करता,त्यांनी आरोपी नामे **३)अमित नाना चव्हाण,वय २६ वर्षे,रा.स.नं.१३१,समतानगर,गोसावी वस्ती,शिंदेवस्ती,हडपसर,पुणे ४)संतोष शरणाप्पा जाधव,वय ३७ वर्षे रा. सर्वोदय कॉलनी,मुंढवा,पुणे. ५)राजेंद्र ऊर्फ फांदेबाज ज्ञानेश्वर थेऊरकर,वय ४२ वर्षे रा.पाण्याचे टाकीमागे,गायरान वस्ती,केशव नगर,मुंढवा,पुणे यांनी** सदरचा गुन्हा केल्याचे कबुली दिली असुन, सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. **सदरचे आरोपी यांच्यावर यापुर्वीचे गुन्हे दाखल असुन तडीपार संतोष जाधव यांचेवर पुणे शहरात २० पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहे**

नमुद गुन्हेगारांकडे तपास करता ते एकत्रितपणे पुणे शहरात फिरुन महिलांच्या हातातील बांगडया कट करुन गुन्हे करतात नमुद गुन्हेगारांनी बस मधुन प्रवास करताना गर्दीचा फायदा घेवुन महिलांच्या जवळील पर्स तसेच अंगा वरील दागिने चोरीचे गुन्हे तसेच हातातील बांगडया कटरच्या सहाय्याने कट करुन **शिवाजीनगर पोलीस ठाणे कडील ०३ गुन्हे, डेक्कन पोलीस ठाणेकडील ०२ गुन्हे, भारती विद्यापीठ पोलीस ठाणे ०२ गुन्हे असे ०७ चोरीचे** गुन्हे केल्याचे कबुल केलेले आहे. त्यांच्याकडुन **एकुण ६,८५,०००/- रु किंचे १४३.७५ ग्रॅम सोन्याचे पाटल्या व मंगळसुत्र** तसेच एक रिक्षा जप्त करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,श्री.अमिताभ गुप्ता, मा.पोलीस सह आयुक्त,डॉ.रविंद्र शिसवे, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,श्री.श्रीनिवास घाडगे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,गुन्हे-१,श्री.गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट-१ कडील वरीष्ठ पोलीस निरीक्षक,शैलेश संखे, पोउनि.सुनिल कुलकर्णी पोलीस अंमलदार दत्ता सोनावणे, अनिकेत बाबर, राहुल मखरे, शशीकांत दरेकर, विजेसिंग वसावे, अशोक माने, अय्याज दड्डीकर, सतिश भालेकर, इम्रान शेख, अजय थोरात, अमोल पवार, तुषार माळवदकर, अजय जाधव, महेश बामगुडे , मिना पिंजण, रुक्साना नदाफ यांनी केली.

पुढील तपास **पोउप-नि सुनिल कुलकर्णी** हे करीत आहेत.


युनिट – १
गुन्हे शाखा पुणे


युनिट-१
गुन्हे शाखा,पुणे शहर